पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण

---

**प्रेस नोट दि. ०६/०५/२०२०**

## ''कोरोना (कोविड १९) प्रादुर्भावापासुन संरक्षणार्थ पोलीसांकरीता करण्यात आलेल्या उपाययोजनेबाबत''

लॉकडाउनची प्रभावी अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस दलाकडून मोठया प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सोलापूर जिल्हयाचे सिमेलगत असणारे राज्य तसेच जिल्हा प्रवेश सिमा या पुर्णपणे सिल करण्यात आल्या असुन कोणत्याही प्रकारे कोणाही व्यक्तीस अनधिकृतपणे सोलापूर जिल्हयात प्रवेश देणे प्रतिबंधित करण्यात आले आहे.

परिणामी राज्यात बंदोबस्तावर अहोरात्र कर्तव्य बजाविणारे पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी हे देखिल कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावापासुन सुरक्षित राहिलेले नसुन राज्यात ब-याचशा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना देखिल कोरोनाची लागण झालेचे निष्पन्न झाले आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील ०४ पोलीस कर्मचारी यांना कर्तव्य बजावित असतांना कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव झाला आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस अधीक्षक श्री. मनोज पाटील व अपर पोलीस अधीक्षक श्री. अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कल्याण शाखा यांचेकडून सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकरीता खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

### १. प्रतिबंधात्मक उपाययोजना :-

अ. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना खालील प्रमाणे पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून साधनांचे वाटप करण्यात आले आहे.

| मास्क | सॅनिटायझर | पीपीई किट | हॅन्ड ग्लोज ( जोडी) | छत्री | फेस शिल्ड |
|---|---|---|---|---|---|
| २१,७१८ | १४७० लि. | १६७ नग | ५०० | २०० | १२०० नग |

ब. ५० वर्षे व त्यापेक्षा जास्त वयोगट असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची वैदयकीय तपासणी करण्यात आली असुन नमुद वयोगटातील कर्मचारी यांना कोरोना संबंधित कोणतेही कर्तव्य देण्यात येणार नाही.

ड. ५५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या पोलीस कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारचे कर्तव्य न देता घरी राहणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

### २. निरोगी आरोग्य राहणेकरीता करण्यात आलेल्या उपाययोजना:-

अ. आयुष मंत्रालयाने केलेल्या शिफारसीनुसार करण्यात आलेल्या उपाययोजना :-

- रोगप्रतिकारकशक्ती सक्रिय करण्याकरीता आयुष काढा, च्यवनप्राश देण्याची सोय करण्यात आलेली आहे.
- आर्सेनीक अल्बम ३० हे होमीयोपॅथीक गोळया पुरविण्यात येणार आहेत

ब. राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार करण्यात आलेल्या उपाययोजना :-

-आरोग्य सेवा संचलनालय पुणे यांनी केलेल्या मार्गदर्शनपर सुचनेनुसार पोलीस अधिकारी/ कर्मचारी / होमगार्ड/ कार्यालयीन कर्मचारी यांना हायड्रोक्लोरोक्वीन टॅब्लेट पुरविण्यात येत आहेत.

टिप- वरील औषधे/ टॅबलेट हि वैदयकिय अधिकारी यांनी तपासणी केलेनंतर त्यांनी सुचित केलेल्या पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांनाच आवश्यकतेप्रमाणे देण्यात येणार आहेत.

३. बंदोबस्तावरील कर्मचारी यांचेकरीता करण्यात आलेल्या उपाययोजना :-

अ.पोलीस दलांतर्गत कोरोना विषाणूचा संसर्ग होवु नये या करीता बंदोबस्तावरील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना कर्तव्याच्या ठिकाणी राहणेची व जेवणाची सोय करण्यात आली आहे.

ब. बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी /कर्मचारी **यांना १२ तासापेक्षा जास्त** कालावधीकरिता कर्तव्य न देण्याबाबत आदेश दिले आहेत.

क. पारले बिस्कीट (५,७६० पॉकेट) व गोमो प्रोटीन क्रंचीचे (३६,००० पॉकेट) वाटप करण्यात आले आहे.

ड. बंदोबस्तादरम्यान पोलीस कर्मचारी किंवा त्यांचे कुटूंबियांना काही वैयक्तिक अथवा कौटुंबिक अडचण/मदत हवी असल्यास ७८२३८८८५६७ हा **भ्रमणध्वनी क्रमांक** उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्या आधारे त्यांच्या अडचणी दुरु केल्या जात आहेत.

इ. बंदोबस्तावरील कर्मचारी यांचे अडचणी सोडविणेकरीता कल्याण शाखेकडील एक पोलीस अधिकारी व चार पोलीस कर्मचारी यांचे स्वतंत्र पोलीस पथक तैनात करण्यात आले आहे.

४. कोरोनाबाधीत पोलीस कर्मचारी यांचेकरीता करण्यात येणा-या उपाययोजना

अ. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेशानुसार पोलीस कल्याण निधीमधून प्रत्येकी १,००,०००/- रु अग्रीम कोरोनाबाधीत पोलीस कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेले आहे.

सदरची बातमी आपले लोकप्रिय दैंनिकातून प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रति-

सर्व संपादक, सोलापूर